# राजकन्येला हवा चंद्र

**जेम्स थर्बर**



# राजकन्येला हवा चंद्र

समुद्रकिनारी एक राज्य होतं. तिथल्या राजाला मयूरी नावाची राजकन्या होती. एक दिवस या राजकन्येनं इतकी जांभळं खाल्ली की ती आजारीच पडली.

राजवैद्यांनी मयूरीला तपासलं. त्यांनी राजकन्येची नखं, जीभ पाहिली. राजकन्या तापानं फणफणली होती. राजवैद्य फार काळजीत पडले. त्यांनी राजाला बोलावणं पाठवलं. राजानं येऊन पाहिलं तर त्याची मुलगी मयूरी आजारानं निपचीत पडली होती.

राजा तिच्या शेजारी बसला. त्यानं राजकन्येला प्रेमानं विचारलं, "बाळ, तुला काय होतंय? तुला एखादी गोष्ट मनापासून हवीशी वाटते आहे का?"

राजकन्येनं कसेबसे डोळे उघडले. आणि ती म्हणाली, "हो बाबा, मला चंद्र हवा आहे. चंद्र मिळाला तर मी बरी होईन".

राजाच्या दरबारात एकापेक्षा एक विद्वान लोक होते. राजानं काहीही मागितलं तरी ते आणून देत असत. म्हणून राजा मुलीला म्हणाला, "बाळ मयूरी, तू काही काळजी करू नकोस. तुला चंद्र नक्की मिळेल".

राजा आपल्या दरबारात गेला. त्यानं तीन टाळ्या वाजवल्या. मुख्य वजीर हजर झाले. हे मुख्य वजीर दिसायला चांगलेच उंच पुरे, भर-भक्कम असे होते. त्यांचा चष्मा इतका मोठा होता की, त्यातून

त्यांचे डोळे दुप्पट मोठे दिसत होते. त्या मोठ्या डोळ्यांमुळे ते आहेत त्यापेक्षा जास्त विद्वान दिसत होते.

राजा त्यांना म्हणाला, “वजीर, आम्हाला चंद्र हवा आहे. राजकन्या मयूरीला चंद्र हवा आहे. त्याशिवाय तिला बरं वाटणार नाही”.

“चंद्र” वजीराचे डोळे विस्फारले. त्यामुळे तो आधीपेक्षा चौपट बुद्धिमान दिसू लागला.

“हो. हो. चंद्र! चांदोबा! आज रात्री किंवा फार फार तर उद्या सकाळपर्यंत चंद्र हवा आहे”.



मुख्य वजीरानं रूमालानं आपल्या चेहऱ्यावरचा घाम पुसला. एक दीर्घ श्वास घेतला आणि म्हणाला, “महाराज, मी आजपर्यंत आपल्यासाठी खूप चित्र-विचित्र गोष्टी शोधून आणल्या आहेत. थांबा ! माझ्याकडे यादीच आहे त्यांची” असं म्हणत त्यानं खिशातून लांबच लांब यादी काढली आणि वाचू लागला, “बघा महाराज, मी आतापर्यंत काय काय आणून दिलंय, हस्तीदंत, गुलाबी हत्ती, माणिक-मोती, हिरे-माणकं, माकडं, मोर, सोनेरी किडे, गाणाऱ्या चिमण्यांच्या जिभा, देवदूतांचे पंख, उडणाऱ्या घोड्यांची शिंगं, बुटके राक्षसं, मत्स्यकन्या, निळे कुत्रे....”

“निळे कुत्रे ! मला तर ते आठवत नाहीये” राजा म्हणाला.

पण इथे यादीत तर लिहिलंय, आणि ते तुम्हाला दिल्याची खूणही केली आहे”.

“ते निळे कुत्रे जाऊ द्या हो !” राजा म्हणाला, ‘आता मला चंद्र हवा आहे’.

वजीर म्हणाला, “महाराज, मी तुमच्याकरता खूप दूरवरून म्हणजे समरकंद, झांजीबार इथून सुद्धा वस्तू आणून दिल्या आहेत. पण चंद्र आणणं अशक्य आहे. चंद्र इथून पस्तीस हजार मैल लांब आहे. तो राजकन्येच्या खोलीपेक्षा मोठा आहे. शिवाय तो तांब्याच्या रसापासून बनला आहे. नाही महाराज ! मी चंद्र आणू शकत नाही. त्यापेक्षा परत निळे कुत्रे आणून देतो”.

हे ऐकून राजा खूपच रागावला. त्यानं वजीराला दरबारातून जायला सांगितलं. मग त्यानं शाही जादूगाराला बोलावणं पाठवलं.



शाही जादूगार म्हणजे अगदीच हडकुळा, खप्पड चेहऱ्याचा माणूस होता. त्यानं गोंडेदार लाल टोपी घातली होती. टोपीवर चंदेरी चांदण्या चिकटवल्या होत्या. त्यानं निळ्या रंगाचा पायघोळ अंगरखा घातला होता. त्यावर सोनेरी रंगाची घुबडं होती. राजाला चंद्र हवा आहे हे ऐकताच जादूगाराचा चेहरा पांढरा फटक पडला.

शाही जादूगार म्हणाला, "महाराज मी आजपर्यंत तुम्हाला कितीतरी जादूचे प्रयोग करून दाखवले आहेत. थांबा. माझ्याकडे यादीच आहे त्यांची. बघा हं... तुमच्या करता मी फणसातून रक्त आणि रक्तातून फणस काढून दाखवला आहे, रेशमी टोपीतून ससा, सशातून फूल, फुलातून कबूतर आणि कबूतरा मधून डफली काढून दाखवली आहे. ह्या सगळ्यांना नंतर गायब करून दाखवलं आहे आणि परत रेशमी टोपी काढून दाखवली आहे. भविष्य सांगणारं जादूचं घड्याळ, उद्या काय होईल हे दाखवणारा स्फटिकाचा गोल दिला आहे. मी आपल्याकरता मोहरी, रात्रीच्या सावल्या, ससाण्याचे अश्रू यांपासून खास औषध बनवून दिलं होतं. त्यामुळे हल्ली तुम्ही भुतं, हडळी यांना घाबरत नाही. मी तुम्हाला सात मैल लांबीचे बूट, सोनेरी मोजे आणि अदृश्य करणारा अंगरखाही दिला होता."

"छे..छे.. तो अंगरखा काही कामाचा नव्हता" राजा म्हणाला.

"महाराज अंगरखा तर चांगला होता" चादूगार म्हणाला.

"नाही. मुळीच नाही" राजा उत्तरला, 'तो अंगरखा घातला की मी वाटेतल्या वस्तूंवर सारखा धडकायचो".

"अहो महाराज अंगरख्याचं काम होतं आपल्याला अदृश्य करण्याचे. वाटेतल्या वस्तू गायब करणं हे अंगरख्याचं काम नव्हतं.



वाटेतल्या वस्तूंना टक्कर न देता चालण्याचं काम तुमचं होतं." जादूगार म्हणाला.

"मला तर एवढंच आठवतंय की मी सारखा वाटेतल्या वस्तूंवर धडकत होतो" राज म्हणाला.


शाही जादूगारानं परत आपली यादी वाचायला सुरूवात केली, 'बुटक्यांच्या प्रदेशातून शिंगं, हवेतून वाळू, इंद्रधनुष्यातून सोनंसुद्धा, मी तुम्हाला काढून दिलंय. याशिवाय एक डझन शिवणाच्या सुया, दहा मेणबत्त्या... नाही! माफ करा हं! ही यादी मला बायकोनं सांगितलेल्या सामानाची आहे".

“जादूगार, आता आम्हाला चंद्र हवा आहे. त्याशिवाय आमची राजकन्या मयूरी बरी होणार नाही” राजा रागानं म्हणाला.

“चंद्र कोणीच आणू शकत नाही. एक तर चंद्र एक लाख पन्नास हजार मैल लांब आहे. तो ताज्या पनीरचा बनलेला आहे आणि या महालापेक्षा दुप्पट मोठा आहे” जादूगार म्हणाला.

राजा संतापला. त्यानं जादूगाराला त्याच्या गुहेत परत पाठवलं. मग राजानं शाही गणितज्ञाला बोलावलं.

शाही गणितज्ञाला टक्कल होतं. त्यांना जवळचं जरा कमी दिसत असे. त्यांनी डोक्यावर टोपी घातली होती. दोन्ही कानांमागे एकेक पेन्सिल ठेवली होती. त्यांनी पांढरे अंक लिहिलेली काळी शर्ट पँट घातली होती.



राजानं गणितज्ञ आल्या आल्या त्याला फर्मावलं. “१९०७ सालापासून तुम्ही माझ्या करता काय काय केलंय, त्याची यादी मला नकोय. मला माझ्या मुलीकरता चंद्र हवा आहे. तो कसा आणता येईल ते सांगा. चंद्र मिळाल्याशिवाय आमची कन्या मयूरी बरी होणार नाही.”

“महाराज १९०७ सालापासून मी आपल्याकरता ज्या समस्या सोडवल्या. त्या आपल्या लक्षात आहेत हे ऐकून मला खूप आनंद झाला” गणितज्ञ म्हणाले, “सुदैवानं माझ्याकडे त्याची यादी तयारच आहे”.

असं म्हणत गणितज्ञानं आपल्या खिशातून गुंडाळी केलेला एक कागद काढला आणि वाचायला सुरूवात केली. “पहा. याच्यात काय आहे. मी तुम्हाला रात्र आणि दिवस, क आणि ख यांच्यातलं अंतर सांगितलं आहे. उंची किती उंच असते, अनंत अंतर जायला किती वेळ लागेल हे सांगितलं आहे. आपल्याकडे किती एकवचनं आहेत जी अनेकवचनात बदलू शकतात. समुद्रातलं मीठ वापरून तुम्ही किती चिमण्या पकडू शकाल? अं...अं.. अठरा कोटी, सत्याहत्तर लक्ष, शहाण्णव हजार एकशे बत्तीस”.

“अहो पृथ्वीवर एवढ्या चिमण्याच नाहीत” राजा म्हणाला.

“तेवढ्या चिमण्या आहेत असे मी म्हणत नाहीये. तेवढ्या चिमण्या तुम्ही पकडू शकाल असं मी म्हणतोय” जादूगार.

“खड्ड्यात गेल्या त्या चिमण्या. मला उगीच कुठल्या तरी काल्पनिक अठरा कोटी चिमण्यांचं काही सांगू नका. मला माझ्या मुलीकरता चंद्र हवा आहे” राजा कडाडला.

“चंद्र तर तीन कोटी मैल लांब आहे” शाही गणितज्ञ म्हणाला, “तो नाण्याप्रमाणे गोल आणि चपटा आहे. तो ॲस्बेस्टॉस पासून बनला आहे. आपल्या राज्याच्या अर्ध्या आकारा एवढा तरी असेल. शिवाय तो आकाशाला चिकटलेला आहे. पृथ्वीवरचा कोणी माणूस चंद्र आणू शकत नाही”.

रागानं राजाची तळपायाची आग मस्तकाला गेली.

त्यानं शेवटी विदूषकाला बोलावलं.

रंगीबेरंगी कपडे, गोंडेदार त्रिकोणी टोपी घातलेला विदूषक कोलांट्या उड्या मारतच दरबारात आला आणि राजाच्या पायापाशी बसला.

“सांगा महाराज आपली काय सेवा करू?” विदूषकानं नम्रतेनं विचारलं.

राजा दुःखानं म्हणाला, “माझ्याकरता आता कोणीच काही करू शकत नाही. राजकन्या मयूरीला चंद्र हवा आहे. त्याशिवाय तिची तब्येत बरी होणार नाही. जाऊ दे. तू थोडा वेळ माझ्याकरता वीणेवर एखादी उदास धून वाजव बरं”.

विदूषकाने विचारले, “आपल्या दरबारातले विद्वान लोक काय म्हणताहेत? चंद्र केवढा आहे आणि किती लांब आहे?”

“मुख्य वजीर म्हणतात, चंद्र पस्तीस हजार मैल लांब आहे आणि राजकन्येच्या महालापेक्षा मोठा आहे. जादूगाराचं म्हणणं आहे. चंद्र दीड लाख मैल लांब आहे. तर गणितज्ञाच्या मते चंद्र तीन लाख मैल लांब आहे. आपल्या राज्याच्या अर्ध्या आकाराएवढा आहे” राजानं दुःखानं सांगितलं.

विदूषकानं काही क्षण वीणेच्या तारा छेडल्या. मग तो म्हणाला, “आपल्या दरबारातले सगळेजण हुशार आणि विद्वान आहेत. त्यामुळे ते म्हणताहेत ते बरोबरच असेल. खरंच चंद्र इतका लांब असेल आणि मोठाही असेल. आता आपण असं करू या, राजकन्या मयूरीलाच विचारू या चंद्र केवढा आहे आणि किती लांब आहे”.

“अरे हे तर माझ्या लक्षातच आले नाही” राजा म्हणाला.

“थांबा महाराज, मीच जाऊन तिला विचारतो” असं म्हणत विदूषक उठला.

तो हळूच राजकन्येच्या महालात गेला. राजकन्या जागीच होती. पण तिचा चेहरा मलूल झाला होता आणि आवाजही खोल गेला होता.

“तुम्ही माझ्याकरता चंद्र आणलाय का?” तिने विचारले.




“अजून आणला नाहीय. पण लवकरच आणीन हं, तू मला सांग बरं, चंद्र केवढा आहे?”

“माझ्या अंगठ्याच्या नखाएवढा असेल, कारण मी चंद्रासमोर अंगठाधरला तर तो त्यामागे झाकला जातो”. राजकन्या म्हणाली.

“वा! छान! आणि चंद्र किती लांब असेल गं?” विदूषकाने विचारले.

“माझ्या खिडकीतून ते झाड दिसतंय नं? त्याच्यापेक्षा उंच नक्कीच नसेल. कारण कधी कधी चंद्र मला त्या झाडांच्या फांद्यांमध्ये अडकलेला दिसतो” राजकन्या उत्तरली.

“वा! तुझ्याकरता चंद्र आणणं सोप्पं आहे. आज रात्री चंद्र जेव्हा वरच्या फांदीवर येईल तेव्हा मी झाडावर चढून त्याला घेऊन येईन हं” विदूषक म्हणाला. त्यानं थोडावेळ विचार केला आणि परत राजकन्येला विचारलं, “बाळ मयूरी, तुला काय वाटतंय, चंद्र कशाचा बनलेला असावा?”

“ओहो! विदूषक काका, चंद्र चांदीचा बनलाय इतकं साधं सुद्धा तुम्हाला माहिती नाही?”.

विदूषक राजकन्येच्या महालातून निघाला तो थेट शाही सोनाराकडे गेला. त्यानं सोनारा-कडून चांदीचा एक चिमुकला गोल बनवला. त्याला नाजूक सोन्याची साखळी लावली. शाही सोनारानं विदूषकाला विचारले, “हे मी बनवलंय त्याला काय म्हणायचं?”

“हा तू चंद्र बनवला आहेस” विदूषक म्हणाला.

“पण चंद्र तर पाच लाख मैल लांब आहे आणि ब्रॉन्झच्या गोटीसारखा गोल आहे” सोनार म्हणाला.

“असं तुला वाटतंयं” जाता जाता विदूषकाने उत्तर दिले.

तो पिटकुला चंदेरी चंद्र घेऊन विदूषक राजकन्येकडे गेला. त्यानं मयूरीच्या गळ्यात तो चंद्र घातला. ती एकदम खूष झाली. तिचा आजार पळाला. दुसऱ्या दिवशी सकाळी ती आनंदानं बागेत खेळत होती.

पण राजाची काळजी अजून मिटली नव्हती. त्याला माहिती होतं रात्री चंद्र उगवला की, राजकन्येला कळणारच तिच्या गळयातला



चंद्र हा काही आकाशातला खरा चंद्र नाही. मग ती परत आजारी पडेल की काय?

राजानं परत मुख्य वजिराला बोलावलं व त्याला सांगितलं, "काहीही करा पण आज रात्री राजकन्येला आकाशात चंद्र दिसता कामा नये" वजिराने बराच वेळ डोक खाजवलं, मग तो म्हणाला, "मला एक उपाय सुचतोय. आपण राजकन्येला गडद काळ्या रंगाचा चष्मा घालायला देऊ. म्हणजे तिला काहीच दिसणार नाही आकाशातला चंद्र सुद्धा दिसणार नाही"

"छे: छे: राजकन्येनं काळा चष्मा घातला तर वाटेतल्या वस्तूवर ती अडखळेल, पडेल, परत आजारी पडेल." राजा रागानं म्हणाला त्यानं शाही जादूगाराला बोलावणं पाठवलं. आणि म्हणाला, "आपण चंद्राला लपवलं पाहिजे. म्हणजे राजकन्येला आकाशात आज चंद्र दिसणार नाही, सांगा चंद्राला कसं झाकता येईल?"

शाही जादूगारानं थोडावेळ शीर्षासन केलं. मग सरळ उभा राहून तो म्हणाला, "आपण असं करू या. सगळ्या राजवाड्याभोवती उंच बांबू लावून त्यावर काळे मखमलीचे पडदे बांधू या. राजकन्येला पडद्यापलीकडचं दिसणार नाही आणि चंद्रही दिसणार नाही."

हे ऐकून तर राजा आणखीनच संतापला. जोरजोरात हातवारे करत  तो म्हणाला, “अहो जादूगार मखमलीच्या काळ्या पडद्यांनी हवा सुध्दा अडली जाईल. राजकन्येला श्वाससुध्दा घेता येता येणार नाही आणि परत ती आजारी पडेल. जा तुम्ही आणि गणितज्ञांना पाठवा.”

“आपल्याला काही तरी केलं पाहिजे. आज रात्री राजकन्येला चंद्र दिसता कामा नये. तुम्ही एव्हढे विद्वान आहात. जरा ही समस्या सोडवा” राजाने गणितज्ञाला सांगीतले.

शाही गणितज्ञाने विचार करत आधी गोल मग चौकोनी आकारात फेऱ्या मारल्या. नंतर एका जागी स्थिर उभे राहून तो म्हणाला, “सापडला! उपाय सापडला! आपण रोज रात्री राजवाड्याबाहेर हजारो अनार, फटाके, फुलबाज्या लावू. सगळं आकाश त्या ठिणग्यांनी दिवसासारखे प्रकाशमान होईल आणि राजकन्या मयूरीला चंद्र दिसणारच नाही.”

हे ऐकून राजा संतापानं वेडापिसा झाला. जागच्या जागी थयथयाट करत तो ओरडला, “अहो गणितज्ञ, काही तरी काय सांगताय, फटाक्यांच्या आवाजांनी राजकन्येला रात्रभर झोप लागणार नाही. शिवाय प्रदूषण होईल ते वेगळंच. त्यामुळे परत राजकन्या आजारी पडले. जा तुम्ही! चालते व्हा!”

राजानं बाहेर पाहिलं तर संध्याकाळ उलटून अंधार झाला होता. आता कुठल्याही क्षणी क्षितिजावर चंद्र येणार होता. राजा खूपच अस्वस्थ झाला. त्याने विदूषकाला बोलावणं पाठवलं. विदूषक ताबडतोब हजर झाला.

“मी आपली काय सेवा करू महाराज?” त्यानं नम्रपणे विचारलं.

“माझ्याकरता कोणी काही करू शकत नाही. आता आकाशात चंद्र उगवेल. मग राजकन्येला कळेलच की, तिच्या गळ्यातला चंद्र खरा नाही. मग ती परत आजारी पडेल. मला काही सुचत नाहीये. तू माझ्याकरता कोणती तरी खूप उदास, दर्दभरी धून वाजव.”

विदूषकानं वीणा छेडता छेडता राजाला हळूवार आवाजात विचारले, “आपले दरबारी विद्वान काय म्हणताहेत?”

“राजकन्या परत आजारी पडणार नाही असा कुठलाही उपाय त्यांना सुचत नाहीये” राजा म्हणाला.



विदूषक शांतपणे विचार करत होता. तो म्हणाल, “आपले विद्वान चंद्राला लपवू शकत नाहीत याचा अर्थ चंद्र लपूच शकत नाही.”


राजाने दोन्ही हातांनी आपला चेहरा झाकून घेतला आणि आवंढा गिळला. नंतर त्याने खिडकीकडे पाहिले आणि तो ओरडलाच, “ते बघ! राजकन्येच्या खिडकीतून दिसण्याइतका चंद्र वर आला आहे. अरे देवा, आता मी काय करू? कोण माझ्या मुलीला समजावेल? चंद्र आकाशातही चमकतो आहे आणि त्याचवेळी तिच्या गळ्यातही सोनसाखळीत लटकतो आहे. हे कसं शक्य आहे?”

विदूषकानं हातातली वीणा खाली ठेवली. राजाला समजावत तो म्हणाला, “आपल्या विद्वानांच्या मते चंद्र खूप लांब आणि मोठा होता. त्याला आणणं शक्य नव्हतं. पण आपल्या राजकन्येनं हा प्रश्न स्वतःच सोडवला की नाही? म्हणजे ती आपल्या विद्वानांपेक्षा जास्त हुशार आहे. हा दोन चंद्रांचा प्रश्नही तीच सोडवेल, मी तिलाच विचारून येतो.” असं म्हणत विदूषक राजकन्येच्या महालात गेला.

राजकन्या आपल्या पलंगावर पहुडली होती, पण जागीच होती. ती आकाशातल्या चंद्राकडे पहात होती. तिच्या हातात विदूषकानं बनवलेला छोटा चंद्र होता.

विदूषकाच्या डोळ्यात पाणी आलं. त्याने राजकन्येला विचारले, “बाळ मयूरी, आकाशातही चंद्र आहे आणि तुझ्या गळ्यातही चंद्र आहे. हे कसं शक्य आहे?”

राजकन्या विदूषकाकडे बघत जोरात हसली आणि म्हणाली, “हात तिच्या, त्यात काय एव्हढं, आज आकाशात नवीन चंद्र



उगवला आहे. गेल्या वर्षी माझा दात पडला तर त्या जागी नवीन दात आला की नाही, तसाच."

"अरे हो खरंच की", विदूषक म्हणाला.

हरणांच्या काही जातीतही उन्हाळ्यात शिंगं झडतात आणि पुढच्या वर्षी परत तिथेच नवीन शिंगं येतात. खरंच किती सोपं आहे हे ! माझ्या लक्षातच आलं नाही, कारण आज रात्र झाली तरी परत उद्या नवीन दिवस उगवतोच."

"बरोबर ! चंद्राचंही असंच होतं. रोज नवीन चंद्र उगवतो. मला वाटतं जगात सगळ्याच गोष्टींचं असं होत असेल" हे बोलत असतानाच राजकन्येचा आवाज हळू होत गेला आणि तिला झोप लागली. विदूषकानं हळूच राजकन्येच्या अंगावर शाल घातली. महालातून बाहेर पडण्यापूर्वी तो खिडकीकडे गेला आणि त्यानं चंद्राकडे पाहून डोळे मिचकावले. विदूषकाला वाटलं, चंद्र ही हसत हसत त्याच्याकडे बघून डोळे मिचकावतो आहे.

❀❀❀